भारतीय विद्या भवनचे
# सरदार पटेल अभियांत्रिकी महाविद्यालय
भवन्स कॅम्पस, मुन्शी नगर, अंधेरी (पश्चिम), मुंबई ४०००५८.
(शासकीय अनुदानित स्वायत्त शिक्षण संस्था)

## <u>परिपत्रक</u>

**दिनांक:** २१ सप्टेंबर २०२०

महाराष्ट्र शासन, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, शासन निर्णय क्रमांक: संकीर्ण २०२०/प्र. क्र. १७८/विशि-३, दिनांक १८ सप्टेंबर २०२० अन्वये, संस्थेतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांच्या कार्यालयीन उपस्थितीबाबत निर्देश दिलेले होते. सदर शासन निर्णयानुसार संस्थेतील सर्व कर्मचाऱ्यांनी यापुढे १००% कार्यालयीन उपस्थिती राखण्याबाबत संस्थेने दिनांक १८ सप्टेंबर २०२० रोजी परिपत्रक काढले होते.

तथापि, महाराष्ट्र शासन, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, शासन निर्णय क्रमांक: संकीर्ण २०२०/प्र. क्र. १७८/विशि-३, दिनांक २१ सप्टेंबर २०२० अन्वये स्पष्टीकरणात्मक खुलासा केलेला आहे. संस्थेतील सर्व कर्मचाऱ्यांच्या महितीसाठी व योग्य त्या कार्यवाहीसाठी सदर शासन निर्णय सोबत संलग्नीत केलेला आहे. तरी, सदर शासन निर्णयानुसार संस्थेतील परीक्षा व परीक्षेच्या कामाशी संबंधित कर्मचाऱ्यांनी आवश्यकतेनुसार कार्यालयात उपस्थित राहावे व इतर दिवशी घरून कामकाज करावे.

तसेच, संस्थेचे दिनांक १८ सप्टेंबर २०२० रोजीचे संस्थेचे परिपत्रक प्रसिद्ध होण्यापूर्वी लागू असलेल्या नियमांनुसार व संबंधित विभाग प्रमुखांनी दिलेल्या वेळापत्रकानुसार, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी कार्यालयीन उपस्थिती राखावी.

या संदर्भात, महाराष्ट्र शासन/ तंत्र शिक्षण संचालनालय / मुंबई विद्यापीठ यांच्याकडून वेळोवेळी प्राप्त होणाऱ्या सूचना सर्व कर्मचाऱ्यांना कळविण्यात येतील.

(स्वाक्षांकीत/-)
प्र. प्राचार्य

**राज्यातील सर्व अकृषी विद्यापीठे, संलग्नित महाविद्यालये, अभिमत विद्यापीठे, स्वयंअर्थसहाय्यित विद्यापीठे यामधील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी यापुढे १०० टक्के उपस्थित राहण्याबाबत स्पष्टीकरणात्मक खुलासा.**

**महाराष्ट्र शासन**

**उच्च व तंत्र शिक्षण विभाग**

**शासन निर्णय क्रमांक: संकीर्ण २०२०/प्र.क्र.१७८/विशि-३,**

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२,

दिनांक: २१ सप्टेंबर, २०२०.

**संदर्भः** शासन निर्णय, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, क्रमांक: संकीर्ण २०२०/प्र.क्र.१७८/विशि-३, दिनांक १८ सप्टेंबर, २०२०.

**प्रस्तावनाः-**

राज्यातील सर्व अकृषी विद्यापीठे, संलग्नित महाविद्यालये, अभिमत विद्यापीठे, स्वयंअर्थसहाय्यित विद्यापीठे यामधील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी यापुढे १०० टक्के उपस्थित राहण्याबाबत संदर्भाधीन दिनांक १८ सप्टेंबर, २०२० रोजी शासन निर्णय निर्गमित करण्यात आला आहे. याबाबत विविध शिक्षक व शिक्षकेतर संघटनांकडून निवेदने प्राप्त झाली आहेत. त्यामुळे याबाबत शासन स्तरावरुन स्पष्टीकरणात्मक खुलासा करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णयः-**

उपरोक्त संदर्भाधीन दिनांक १८ सप्टेंबर, २०२० रोजीच्या शासन निर्णयाच्या अनुषंगाने खालीलप्रमाणे स्पष्टीकरणात्मक खुलासा करण्यात येत आहेः-

(१) संदर्भाधीन दिनांक १८ सप्टेंबर, २०२० रोजीच्या शासन निर्णयान्वये परीक्षा व परीक्षेच्या कामाकाजाशी संबंधित शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची उपस्थिती आवश्यक असणार आहे. तथापि, सदर उपस्थिती ही ऑनलाईन किंवा प्रत्यक्ष, जशी शक्य आहे त्याप्रमाणे आवश्यकतेनुसार लागू राहिल.

(२) परीक्षा व परीक्षेशी संबंधित कामाकाजाचा खोळंबा होऊ नये म्हणून विद्यापीठे/ महाविद्यालयांनी उपस्थितीसंदर्भात आपल्या स्तरावर गरजेनुसार निर्णय घ्यावा. यासंदर्भात सर्व संबंधित विद्यापीठांनी/ शैक्षणिक संस्थांनी आवश्यक ती कार्यवाही त्वरीत करावी.

२. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०२००९२११७३५३५२६०८ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

Pravinkumar Gulabrao Pawar

Digitally signed by Pravinkumar Gulabrao Pawar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Higher and Technical Education, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=8de261729f06eda4a56aba947eceb6140d7406426b2f08c9317bea2458ec1f92, serialNumber=8f18625adb482a7ee2512cea93ce697388c95a99c89e41e85c05a3de8476488f, cn=Pravinkumar Gulabrao Pawar
Date: 2020.09.21 17:38:13 +05'30'

**( प्रविणकुमार पवार )**

कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

**प्रत-**

१) मा. राज्यपाल यांचे प्रधान सचिव, राजभवन, मुंबई.
२) मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.
३) मा.उपमुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.
४) मा. मंत्री, उच्च व तंत्र शिक्षण, यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
५) मा. राज्यमंत्री, उच्च व तंत्र शिक्षण, यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
६) मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई.
७) मा.अपर मुख्य सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई.
८) मा.सचिव, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन, मंत्रालय, मुंबई
९) मा.कुलगुरु, सर्व अकृषी विद्यापीठे
१०) मा.कुलगुरु, सर्व अभिमत विद्यापीठे
११) मा.कुलगुरु, सर्व स्वयंअर्थसहाय्यित विद्यापीठे
१२) मा.कुलगुरु, डॉ.बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ, लोणेरे, रायगड
१३) मा.कुलगुरु, कवि कालिदास संस्कृत विद्यापीठ, रामटेक, नागपूर
१४) मा.कुलगुरु, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक
१५) संचालक, उच्च शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र, पुणे
१६) संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र, मुंबई
१७) संचालक, कला संचालनालय, महाराष्ट्र, मुंबई
१८) निवडनस्ती (विशि-३).